मुंबई, वसई - विरार, मीरा-भाईंदर, पालघर, कल्याण, भिवंडी, नवी मुंबई, रायगड, लोनावला, पुणे से एक साथ वितरित

RNI. NO.MAHBIL2011/37119

# मनपा समाचार

web site : manapasamachar.com

वर्ष : ७ ▲ अंक : ८ ▲ मुंबई, सोमवार, १९ ते २५ फेब्रुवारी २०१८ ▲ मराठी : हिंदी साप्ताहिक समाचार पत्र ▲ पृष्ठ - ४ ▲ मुल्य : २ रुपये

## ठाणे पोलिसांना हवेत ५ हजार कर्मचारी

ठाणे. शहरीकरणाबरोबर लोकसंख्याही झपाट्याने वाढली असून गुन्ह्यांचा आलेखही कमी होत नाही. मात्र त्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा वाढत नसल्याने कायदा आणि सुव्यवस्था राखताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागते. ठाणे पोलिस दलात अधिकारी अधिकारी आणि कर्मचारी मिळून दहा हजारांच्या आसपास कर्मचारी असले तरी आणखी पाच हजारांहून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याबाबतचा सुधारित प्रस्तावत काही दिवसांपूर्वी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवण्यात आलेला आहे. ठाणे पोलिस आयुक्तालयात पाच परिमंडळ असून पोलिस ठाण्यांची संख्या ३५ आहे. त्याबरोबर गुन्हे शाखा, विशेष शाखा, वाहतूक शाखा आदी अनेक शाखा आहेत. नेहमी काही ना काही छोटे-मोठे गुन्हे घडत असतात.




या गुन्ह्यांबरोबर गुन्हेगारी टोळ्यांच्याही हालचालीवर पोलिसांना लक्ष ठेवावे लागते. रस्त्यावरील गुन्हे रोखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर असते. काही वेळा आंदोलनाला हिंसक वळण लागते. अशा वेळी मोठ्या प्रमाणावर पोलिस कर्मचाऱ्यांची गरज भासते. पोलिसांना इतरही प्रशासकीय कामे असतात. मोर्चे, धरणे तसेच सण, उत्सवातही पोलिसांना चोख बंदोबस्त ठेवावा लागतो. व्हीआयपींनाही पोलिस सुरक्षा पुरवली जाते. वाहतुकीचे नियोजन करण्याची मोठी जबाबदारी वाहतूक शाखेवर असते. आजघडीला पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, भिवंडी, उल्हासनगर आदी मोठी शहरे असून या श्हारांची लोकसंख्या सुमारे ७० ते ८० लाखांच्या आसपास आहे. लोकसंख्या वाढली मात्र पोलिसांची संख्या वाढत नसल्याचे दिसते. सध्या ठाणे पोलिस दलात नवीन २३८ पोलिस शिपाई पदांची भरतीप्रक्रिया सुरू झाली असून ही पदे ३१ डिसेंबर २०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या पदांच्या संख्येनुसार ही नवीन पदे भरण्यात येणार आहेत. चालू वर्षाच्या अखेरपर्यंत १६६ पोलिस कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. ही पदे भरल्यानंतरही संख्याबळाचा प्रश्न सुटणार नाही. १९८१ मध्ये ठाणे पोलिस आयुक्तालयाची कर्मचाऱ्यांची २ हजार ५८३ पदे मंजूर होती. यामध्ये एएसआय, एचसी, पीएन आणि पीसी या पदांचा समावेश आहे. मात्र २०१८ पर्यंत या पदात वाढ होत आता कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांची संख्या ९ हजार ७५ इतकी आहे. मागील ३६ वर्षात ६ हजार ४९२ इतक्या पदांची वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र वाढणारे गुन्हे तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ठाणे पोलिस दलात आणखीन कर्मचाऱ्याची गरज आहे. सध्या कर्मचाऱ्यांची संख्या ८ हजार ८८७ इतकी असून एक हजाराच्या आसपास अधिकारी आहेत. म्हणजेच दहा हजाराच्या आसपास ठाणे पोलिसांचा फौजफाटा आहे. मात्र आणखी ५ हजार ३८६ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याबाबतचा प्रस्ताव ठाणे पोलिसांनी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवला असल्याचे समजते.

## थोडक्यात

### चौकशीसाठी तीन जणांची समिती, ठाण्यातील विद्यार्थ्यांना मारहाण प्रकरण

ठाणे : येथील गौतम विद्यालयाच्या विश्वस्त शिल्पा गौतम यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मारहाणीप्रकरणी ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी तीन जणांची समिती गठित केली आहे. समितीचे प्रमुख उपशिक्षणाधिकारी अंकुश शिंदे असून समितीने शनिवारी मारहाण आणि इतर १४ मुद्द्यांवर शाळेत जाऊन तपासणी केल्याचे सूत्रांनी सांगितले. हिंदू मिशन एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या वतीने गौतम विद्यालय चालवण्यात येते. संस्थेच्या विश्वस्त शिल्पा गौतम यांनी राग अनावर झाल्याने बुधवारी विद्यार्थ्यांना फायबर काठीने मारहाण केल्याची तक्रार पालकांनी ठाणेनगर पोलिसांत केली. पोलिसांनी १८ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर शुक्रवारी शिल्पा गौतम यांना अटक केली. त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे. याप्रकरणी ठाणे जिल्हा ओबीसी समाज संघटनेचे अध्यक्ष राज राजापूरकर यांनी मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे तक्रार केली. त्यांनी ठाणे जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करून शाळेवर प्रशासकीय अधिकारी नेमण्याची सूचना केली. त्यानुसार, समिती गठित करण्यात आली. विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या सूचनेनंतर तातडीने उपशिक्षणाधिकारी यांच्यासह तीन जणांची समिती गठित केली. त्या समितीचा अहवाल सादर झाल्यावर पुढील कारवाई केली जाईल.




### ठाण्यात घरात शिरकाव करून तरुणीचा विनयभंग, रोमिओला अटक

ठाणे : घरात शिरकाव करून तरुणीचा विनयभंग करणाऱ्या रोमिओला श्रीनगर पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली. विनोद रंगा रावल (२१) असे त्याचे नाव असून तो वागळे इस्टेट रोड २७ येथील नेपाली चाळीत राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. वागळे इस्टेट येथे राहणाऱ्या वीसवर्षीय तरुणीला कॉलेजला जाताना तो वारंवार रस्त्यात अडवून रिलेशन ठेवण्याची मागणी करत होता. मात्र, या गोष्टीला तिने त्याला नकार देऊनसुद्धा तो पाठलाग करून तिला दुचाकीवर बसण्याची मागणी करत होता. १६ फेब्रुवारीला त्याने तिच्या घराबाहेर तिचे नाव घेऊन जोरजोरात ओरडण्यास सुरुवात केली होती. तेव्हा आईवडिलांना नाव सांगेल, असे सांगून ती घरात गेली. दरम्यान, तिच्यापाठोपाठ घरात त्याने शिरकाव करून त्याने तिचा विनयभंग केला. तसेच तिला मारहाण करून शिवीगाळ केली. यावेळी तिला सोडवण्यासाठी आलेल्या महिलेसदेखील त्याने शिवीगाळ केली. प्रकरणी त्या पीडित तरुणीने शुक्रवारी रात्री श्रीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी गुन्हा नोंदवून त्याला तत्काळ अटक केली. याप्रकरणी पुढील पोलीस उपनिरीक्षक दिनेश चव्हाण करत आहेत.



### ठाण्यात तीन घरे फोडून साडे सात लाखांचा ऐवज चोरीला

ठाणे: शहरातील कापूरबावडी आणि मुंब्रा या परिसरांत फोडण्यात आलेल्या तीन घरांतून चोरट्यांनी सुमारे साडेसात लाखांचा ऐवज लांबवला आहे. या तिन्ही घटना शुक्रवारी घडल्या असून त्या घटनांमध्ये सुमारे ३४ तोळ्यांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. बाळकुम, शिवाजीनगर येथे राहणारे किरण कुंभार (३९) यांच्या घरातील किचनच्या दरवाजाची आतील कडी उघडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. तसेच कपाटातील आणि कुंभार यांच्या पॅण्टच्या खिशातील पाकिटातून असे चार लाख दोन हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे. यामध्ये तीन लाखांचे दागिने आणि ५५ हजारांची रोकड असल्याचे तक्रारीत नमूद असून हा प्रकार १५ फेब्रुवारी रात्री १० ते १६ फेब्रुवारी ४.१० वा.च्या सुमारास घडल्याची माहिती कापूरबावडी पोलिसांनी दिली. दुसऱ्या घटनेत, बाळकुम पाडा-१ येथे राहणारे कमलेश ताहिलरमानी (४२) हे १६ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते १ वा.च्या दरम्यान बाहेर गेले होते. याचदरम्यान, चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील ७१ हजारांचे सोन्याचे दागिने घेऊन पोबारा केल्याची माहिती कापूरबावडी पोलिसांनी दिली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक एन.बी. गिरासे तपास करत आहेत. तसेच तिसऱ्या घटनेत मुंब्रा, कौसागावमधील सागर पाटील (२८) हे १६ फेब्रुवारीला काही कामानिमित्त बाहेर गेले होते. दरम्यान, त्यांच्या घराचे कुलूप उचक टून चोरट्यांनी घरातील सोनेचांदीच्या दागिन्यांसह ५५ हजारांची रोकड असा दोन लाख ५८ हजारांचा ऐवज लांबवला आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक व्ही.पी. करडे करत आहेत.



## बनावट नोटासह आरोपीस बेड्या



ठाणे : बनावट नोटा विकण्यासाठी ठाण्यात आलेल्या झारखंडच्या एका आरोपीस खंडणी विरोधी पथकाने मंगळवारी ठाण्यात अटक केली. आरोपीजवळून सुमारे २ लाख रुपयांच्या बनावट नोटा पोलिसांनी हस्तगत केल्या. प्रकास प्रसाद उर्फ शंकर टोकल मोहतो (४२) हे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून, तो ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळील धर्मविरनगरचा रहिवासी आहे. मिस्त्री काम करणारा हा आरोपी मुळचा झारखंडमधील हजारीबाग जिल्ह्याचा रहिवासी आहे. ६० हजार रुपयात एक लाख रुपयांच्या बनावट नोटा विकण्याचा धंदा आरोपी करीत असल्याची गोपनीय माहिती खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजकुमार कोथमिरे यांना मिळाली होती. त्यानुसार खंडणी विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यानी आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचला. पोलिसांनी ग्राहक बनून आरोपीशी संपर्क साधला. त्याला पोलिसांनी २५ लाख रुपयांच्या बनावट नोटा मागितल्या होत्या. मंगळवारी दुपारी ज्ञानसाधना महाविद्यालयासमोर बनावट नोटा घेऊन येण्यास आरोपी तयार झाला. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक एस.आर. गावंड, एच.ए. ढोले आणि व्हि.के. बाबर आदींच्या पथकाने सापळा रचला. दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास आरोपी ज्ञानसाधना महाविद्यालयासमोर पोहोचताच पोलिसांनी त्याला शिताफीने अटक केली. आरोपीची अंगझडती घेतली असता २ हजार रुपयांच्या ११३ आणि नवीन ५०० रुपयांच्या १० बनावट नोटा त्याच्याजवळ आढळल्या. याशिवाय १०० रुपयांच्या दोन खऱ्या नोटाही त्याच्याजवळ होत्या. एकूण २ लाख ३१ हजार २०० रुपये पोलिसांनी आरोपीजवळून हस्तगत केले. आरोपीस अटक करण्यात आली असून, त्याच्याविरूद्ध वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



## नागपुरात पत्रकाराच्या आई व मुलीचे अपहरण करून हत्या

नागपूर. नागपूरचे पत्रकार रवीकांत कांबळे यांच्या आई व दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण करून हत्या करण्यात आली आहे. उषा कांबळे (६०) आणि राशी कांबळे अशी मृतकांची नावे आहेत. रवीकांत कांबळे हे नागपूर टुडे स्थानिक वेब पोर्टलचे गुन्हे वार्ताहर आहेत. या घटनेनंतर नागपुरात खळबळ उडाली आहे. पूर्व वैमनस्यातून हे हत्याकांड झाल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे. कांबळे यांच्या आई आणि मुलगी शनिवारी संध्याकाळपासून बेपत्ता होत्या. तेव्हापासूनच त्यांचा शोध सुरू होतो. अखेर रविवारी सकाळी या दोघी मृतावस्थेत मरेड मार्गावरील दिघोरी नाका परिसरातील संजुबा शाळेच्या मागे आढळून आले. रवीकांत कांबळे यांच्यासोबत असलेल्या वैयक्तिक शत्रुत्वातून आरोपींनी त्यांच्या आई व मुलीचा खून केला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## गोकुळनाथ शेट्टीसह तिघांना अटक

मुंबई, शनिवार- पंजाब नॅशनल बँकेतील गैरव्यवहारप्रकरणी सीबीआयने शनिवारी बँकेच्या ब्रीच कँडी येथील शाखेचा निवृत्त शाखा उपव्यवस्थापक गोकुळनाथ शेट्टी आणि त्याच्यासह आणखी दोघांना अटक करण्यात केली. हेमंत भट्ट आणि मनोज खरात अशी अटक करण्यात आलेल्या इतर दोघांची नावे आहेत. नीरव मोदीचा घोटाळा यूपीएच्या कार्यकाळात म्हणजे २०११ मध्ये सुरु झाला होता असा दावा भाजपाने केला होता. मात्र सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये हा घोटाळा २०१७ ते १८ दरम्यान म्हणजेच एनडीएच्याच कार्यकाळात झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या एफआयआरमुळे भाजपाचा दावा फोल ठरला आहे. पीएनबी घोटाळा उघड झाल्यापासून करण्यात आलेली ही पहिलीच मोठी कारवाई आहे. सीबीआयने गोकुळनाथ शेट्टीच्या घरी धाड टाकली त्यानंतर त्याच्या पत्नीची आणि भावाचीही चौकशी केली आहे. मनोज खरात हा सिंगल विंडो ऑपरेटर



तर हेमंत भट्ट हा नीरव मोदी आणि ग्रुपचा अधिकृत स्वाक्षरीकर्ता (ऑथराईज्ड सिग्नेटरी) असल्याची माहिती समोर येते आहे. पंजाब नॅशनल बँकेला ११५०० कोटींचा चुना लावून नीरव मोदी पळाला आहे. नीरव मोदीला लेटर ऑफ अंडरटेकिंग मिळवून देण्यात गोकुळनाथ शेट्टीचा मोठा हात असल्याची माहिती समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. पीएनबी घोटाळ्याच्या चौकशीसाठी सीबीआयने २१ पेक्षा जास्त मालमत्तांवर छापे मारले आहेत. या मालमत्ता नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांच्या आहेत. तसेच हे धाडसत्र सुरुच राहणार असल्याचे इडीनेही स्पष्ट केले आहे. शुक्रवारी सीबीआयने या प्रकरणी नव्याने आरोपपत्र दाखल केले. ज्यामुळे गीतांजली ग्रुपचा प्रमोटर मेहुल चोक्सी आणि पीएनबीच्या दोन अधिकाऱ्याची नावे आहेत. तसेच नीरव मोदीचेही नाव आहेत.

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघातात दोन ठार

पालघर :पालघर येथे मुंबई-अहमदाबाद महामार्गावर टेम्पो आणि कंटेनरच्या भीषण अपघातात दोनजण जागीच ठार झाले. हा अत्यंत भीषण अपघात होता. अपघातात टेम्पोचा चक्काचूर झाला असून या महामार्गावर काही काळ वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. मुंबईहून गुजरातकडे जाणाऱ्या कंटेनरच्या चालकाचं मुंबई-अहमदाबाद




महामार्गावरील चिंचपाडा येथे नियंत्रण सुटलं आणि हा कंटेनर टेम्पोवर जाऊन धडकला. कंटेनरची जोरदार धडक बसल्याने टेम्पोचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे. अपघातानंतर या कंटेनरमधील सर्व सामान रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलं. या भीषण अपघातात दोन जण जागीच ठार झाले असून त्यांची ओळख अद्याप पटली नाही. या भीषण अपघातामुळे महामार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. सुमारे ५ किलोमीटरपर्यंतच्या रांगाच रांगा या महामार्गावर लागल्या होत्या. त्यामुळे मुंबईकडे येणाऱ्यांची लटकंती झाली. दोन तासाच्या प्रयत्नानंतर हा टेम्पो आणि कंटेनर बाजूला सरकविण्यात आला असून त्यामुळे वाहतुकीची कोंडी पूर्ववत करण्यात आली आहे.